पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २१९। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | मंगळवार ०८/०९/२०२६ । पाने - ८

सिल्क फेस्टीवल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# सीसीटीव्ही, स्मारके, मार्केटने संगमनेरचे रूप बदलणार

## नगरपरिषदेकडून चांगल्या सुविधा आणि विकासाची कामे - मा. मंत्री थोरात

## सर्वांना अभिमान वाटेल असे काम करून दाखविणार - आ. सत्यजित तांबे



### संगमनेरच्या सुरक्षेला डिजिटल कवच!

संगमनेर शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि संवेदनशील ठिकाणांवर अत्याधुनिक २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे. गुन्हेगारीला आळा घालणे, वाहतूक नियंत्रण, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही यंत्रणा महत्त्वाची ठरणार आहे. याशिवाय ११ प्रमुख चौकांमध्ये माहिती देणारे स्पीकर बसविण्यात आले आहेत. त्यामुळे संगमनेर शहराच्या सुरक्षिततेला आता आधुनिक तंत्रज्ञानाची साथ मिळणार आहे.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - निवडणुका झाल्यानंतर विकासकामांवरून राजकारण करण्याची संगमनेरची परंपरा कधीच नव्हती. मात्र सध्या सुरू असलेले राजकारण हे पोरकटपणाचे आणि दुर्दैवी आहे. संगमनेर नगरपरिषदेने मागील आठ महिन्यांत नागरिकांना चांगल्या सुविधा देतानाच दर्जेदार विकासकामांना प्राधान्य दिले आहे. यापुढील काळातही विकासाच्या प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा राहणार आहे. शहराच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक २०० सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित झाल्याने शहराच्या सुरक्षेला मोठी मदत होणार आहे, असे प्रतिपादन कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

### महापुरूषांच्या स्मारकासाठी युवावार्ताचा प्रथम पुढाकार

संगमनेर नगरपालिकेच्यावतीने शहरांमध्ये महापुरूषांच्या पुतळ्यांची निर्मिती करीत असताना उभारणीचा निधी लोकसहभागातून मिळविण्यासाठी नगरपालिकेने विशेष क्यूआर कोड निर्माण केला. या क्यूआर कोडचे अनावरण होत असतानाच दैनिक युवावार्ताद्वारे स्कॅन करून ११000 रुपयाची प्रथम देणगी संस्थापक किसन भाऊ हासे यांनी नगरपालिकेस सुपूर्द केली. लोकसहभाग कार्यात दैनिक युवावार्ताने प्रथम पुढाकार घेतल्याने संयोजकांकडून विशेष अभिनंदन करण्यात आले. युवावार्ताच्या पुढाकाराचे प्रमुख पाहुण्या सुवर्णाताई मालपाणी यांनी जाहीर कौतूक करून स्वयंमस्फूर्तीने दिलेल्या देणगीचा जाहीर उल्लेख करून अभिनंदनही केले. संगमनेर नगरपालीकेच्या नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, उपनगराध्यक्ष नुरमोहमंद शेख तसेच नगरसेवकांनीही दैनिक युवावार्ताचे अभिनंदन केले.

दरम्यान, निधी कसा आणि कोठून आणायचा, हे आम्हाला चांगले माहीत आहे. विरोधकांनी न आणलेल्या निधीचे आणि न केलेल्या कामांचे श्रेय घेऊ नये, असा नाव न घेता टोला आमदार सत्यजित तांबे यांनी विरोधकांना लगावला.

संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने शहरातील विविध भागांत बसविण्यात आलेल्या २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह फूड कोर्टचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात माजीमंत्री बाळासाहेब थोरात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे होते.

व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णाताई मालपाणी, आमदार सत्यजित तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. सौ. मैथिली तांबे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, माजी नगराध्यक्ष दिलीपराव पुंड, विश्वासराव मुर्तडक, कैलास लोणारी, अरुण वाकचौरे यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

बाळासाहेब थोरात म्हणाले, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे १९९२ मध्ये नगराध्यक्ष झाले आणि त्यानंतर संगमनेर शहराच्या विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली. (पान ७ वर)

# अवैध वाळू वाहतुकीवर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पठार भागात अवैध वाळू वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत १० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. साकूर-पिंपळगाव देपा मार्गावर करण्यात आलेल्या या कारवाईत वाळू वाहतूक करणाऱ्या ढंपरचालकाला ताब्यात घेण्यात आले असून, वाहनमालक मात्र फरार झाला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला साकूर ते पिंपळगाव देपा रस्त्याने एका ढंपरमधून अवैधरीत्या वाळूची वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने पिंपळगाव देपा येथील खंडोबा मंदिराजवळ सापळा रचला. संशयित ढंपर तेथे येताच पोलिसांनी त्याची तपासणी केली असता त्यामध्ये वाळू आढळून आली.



यावेळी ढंपरचालक प्रशांत सुनिल पवार (वय २१, रा. मांडवे बु., ता. संगमनेर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याच्याकडे वाळू वाहतुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच वाहनमालक शिवराज ज्ञानेदव खेमनर (रा. साकूर, ता. संगमनेर) याच्या सांगण्यावरून वाळू वाहतूक करत असल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली. वाहनमालक सध्या फरार असून, त्याचा शोध सुरू आहे.

या कारवाईत १० लाख रुपये किमतीचा टाटा कंपनीचा ढंपर (एमएच-४२-बीएफ-२५२०) आणि २० हजार रुपये किमतीची वाळू, असा एकूण १० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३५१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०३ (२) तसेच पर्यावरण कायद्यातील कलम ३ व १५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास घारगाव पोलीस करीत आहेत.

या कारवाईमुळे पठार भागातील अवैध वाळू वाहतुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, अशा प्रकारे विनापरवाना वाळू वाहतूक करणाऱ्यांवर पोलिसांकडून आणखी कठोर कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ३५ जणांवर पोलिसांचा 'वॉच'

## हद्दपारीचे प्रस्ताव तयार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहर पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका सुरू केला आहे. शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत यापूर्वी गंभीर स्वरूपाचे दोन किंवा त्यापेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या तसेच गणेशोत्सव काळात शांततेला बाधा निर्माण करण्याची शक्यता असलेल्या ३५ जणांवर पोलिसांची करडी नजर असून, त्यांच्या हद्दपारीचे प्रस्ताव तयार करून अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत.

गणेशोत्सव हा उत्साहाचा आणि धार्मिक एकोप्याचा सण असल्याने या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी शहर पोलिसांकडून संवेदनशील व्यक्ती व संभाव्य उपद्रवी घटकांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. याशिवाय विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे.

याबाबत शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी सांगितले की, गणेशोत्सव काळात शांतता व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या तसेच शांततेला धोका निर्माण करू शकणाऱ्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे. गणेशोत्सवात कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. अशा व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिस निरीक्षक बारवकर यांनी दिला.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सोन्यांच्या दागिन्यांची मजुरी फक्त 7%
मुदत फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
PBM Jeweller's
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदीवर 30% DISCOUNT
ऑफर फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर चावडी जवळ, संगमनेर
7599996999 / 8265036807
Follow us on:

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# ईपीएस-९५ पेन्शनधारकांचा संयमाचा बांध फुटला

युवावार्ता (प्रतिनिधी) श्रीरामपूर

ईपीएस- ९५ योजनेतील निवृत्त पेन्शनधारक कर्मचाऱ्यांनी गेल्या बारा वर्षांपासून विविध सनदशीर मागनि आंदोलन करूनही त्यांच्या मागण्यांकडे सरकारचे पुरेसे लक्ष गेलेले नाही. त्यामुळे आता संयमाचा बांध फुटला असून, न्यायासाठी सरकारशी निकराची लढाई लढण्याची तयारी असल्याचा इशारा राष्ट्रीय संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांनी दिला.

बेलापूर येथील संस्कृती मंगल कार्यालयात जिल्ह्यातील ईपीएस-९५ निवृत्त कर्मचाऱ्यांचा मेळावा झाला. अध्यक्षीय स्थानावरून ते बोलत होते. राऊत म्हणाले, १२ वर्षे तपश्चर्या केली, तर देव प्रसन्न होतो. मात्र, एक तप आंदोलन करूनही सरकार प्रसन्न होत नाही. देशभरातील निवृत्त कर्मचारी रस्त्यावर उतरले, तर सरकारची झोप उडेल. यापुढे देशभर उग्र आंदोलनाची तयारी करण्यात येत असून, सर्वांनी अंतिम लढ्यासाठी सज्ज राहावे. पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर यांनीही सरकारच्या भूमिकेवर टीका केली. निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी राजकीय भूमिका घेऊन आपली ताकद दाखवून देण्याचे आवाहन त्यांनी केले. संसदेत निवृत्त कर्मचाऱ्यांबाबत विचारलेल्या प्रश्नावर चुकीची माहिती देऊन दिशाभूल केल्याचा आरोप करत संबंधित केंद्रीय मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

# एका विद्यार्थ्यासाठी एक बेंच; 'अभिमानास्पद पालकत्वा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## आठवडाभरात ६८ हजारांचा निधी; लोकसहभागातून ४० बेंच उपलब्ध




युवावार्ता (प्रतिनिधी)

गणोरे - 'एका विद्यार्थ्यासाठी एक बेंच, माझे अभिमानास्पद पालकत्व' या अभिनव उपक्रमाला माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, पालक व दानशूर व्यक्तींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अवघ्या आठवडाभरात ६८ हजार रुपयांचा निधी संकलित करून विद्यार्थ्यांसाठी ४० बेंच उपलब्ध करण्यात आले. गणोरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी येथे पोषण महा सप्ताह व दहीहंडी कार्यक्रमादरम्यान बेंचचे लोकार्पण करण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका वृषाली सुनील कडलग यांनी विद्यार्थ्यांना सुविधा मिळाव्यात म्हणून १,७०० रुपये किमतीचा एक बेंच देण्याची संकल्पना मांडली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून या उपक्रमाची आकर्षक प्रतिमा तयार करून ती माजी विद्यार्थी व ग्रामस्थांच्या व्हॉट्सप समूहांवर प्रसारित करण्यात आली. त्याला प्रतिसाद देत रामकृष्ण दातीर यांनी आई संजीवनी दातीर यांच्या हस्ते २० हजार रुपयांची देणगी दिली. त्यानंतर अनेकांनी सहभाग घेत आठवडाभरात ६८ हजारांचा निधी जमा झाला.

या उपक्रमासाठी प्रा. डॉ. अशोक मारुती दातीर (११ हजार), प्रभाकर भीमाशंकर आहेर (५,१००), लताबाई भीमाशंकर आहेर (५,१००), ज्ञानेश्वर भीमाशंकर आहेर (५,१००), रावसाहेब रामभाऊ दातीर (५ हजार), गोरक्षनाथ म्हातारबा दातीर (५ हजार), प्रा. शरद तुपविहिरे (३,४००), रो. सुनील किसनराव कडलग (३,२००), प्राचार्य श्रीकांत माघाडे (१,७००), रो. सुनील घुले (१,७००) आणि रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे अध्यक्ष रो. समीर शाह (१,७००) यांनी योगदान दिले.

यावेळी महाराष्ट्र जिजाऊ ब्रिगेडच्या डॉ. दिपाली पानसरे, डॉ. नीलम शिंदे व स्नेहलता कडलग यांच्या वतीने शाळेला टेबल व सहा खुर्च्या भेट देण्यात आल्या. डॉ. नीलम शिंदे यांनी वाचनालयासाठी २५ पुस्तकेही भेट दिली. पोषण महा सप्ताहनिमित्त विविध पौष्टिक पदार्थांचे प्रदर्शन भरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर माळवे होते. यावेळी अनिल गायकवाड, केंद्रप्रमुख उत्तम गायकवाड, मान्यवर, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. कल्पना पाटील यांनी आभार मानले.

लोकसहभागातून शाळेच्या विकासाला मिळालेली ही साथ 'माझी शाळा, माझी जबाबदारी' या भावनेला बळ देणारी ठरली.

# संगमनेरच्या क्रीडा विकासाला मिळणार नवी दिशा; तीन कोटींचा निधी मंजूर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. सन २०१२ नंतर क्रीडा समितीची एकही बैठक झाली नसल्याचे बैठकीत समोर आले. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्रीडाक्षमता असतानाही आवश्यक सुविधा, मैदाने आणि प्रशिक्षणाचा अभाव असल्याने त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. तीन कोटी रुपयांच्या निधी पैकी एक कोटी नगरपरिषदेकडे वर्ग करण्याबाबत क्रीडा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्याची माहिती क्रीडा समितीचे अध्यक्ष तथा आमदार अमोल खताळ यांनी दिली.

शासकीय विश्रामगृहावर क्रीडा समितीची बैठक घेण्यात आली या बैठकीस मुख्याधिकारी दयानंद गोरे निवासी नायब तहसीलदार सुभाष कदम तालुका क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे सहाय्यक गट विकास अधिकारी राजेंद्र ठाकूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजय टेकाळे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड यांच्यासह क्रीडाशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते

आमदार अमोल खताळ म्हणाले की, तालुक्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी सन २०२१ मध्ये तीन कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. प्रस्ताव सादर केल्यानंतर निधी मंजूर होण्यासाठी काही कालावधी लागतो. महायुती सरकारच्या माध्यमातून हा तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीच्या कामात कोणत्याही प्रकारचे राजकारण केले नाही. तालुक्यातील खेळाडू आणि तरुणांच्या हिताला प्राधान्य दिले जाणार आहे.तीन कोटी रुपयांच्या निधीपैकी एक कोटी रुपये नगरपरिषदेकडे वर्ग करण्याबाबत क्रीडा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या निधीतून नगर परिषदेतर्गत बांधण्यात आलेल्या क्रीडा संकुलाच्या संरक्षक भिंतीचे काम तसेच बॅडमिंटन हॉल दुरुस्ती साठी हा निधी वापरण्यात येणार असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले

शासनाच्या सन २०१६ च्या अध्यादेशानुसार क्रीडा संकुलाची धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी करण्याबाबतही क्रीडा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. क्रीडा संकुलाचे व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी काही पदांवर कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यास तसेच क्रीडा समितीमध्ये काही आमंत्रित सदस्यांचा समावेश करण्यास क्रीडा समितीचे अध्यक्ष या नात्याने मंजुरी देण्यात आली आहे.ग्रामीण भागातील खेळांडुना सरावासाठी पुरेशा सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विस्तृत आणि अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्याचा मानस आहे. त्यासाठी किमान पाच ते दहा एकर जागेचा शोध घेण्याच्या सूचना महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. जागा निश्चित झाल्यानंतर आधुनिक सुविधांनीयुक्त क्रीडा संकुल उभारण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

संगमनेर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक गुणवान खेळाडू आहेत. मात्र, त्यांना योग्य प्रशिक्षण, मैदाने आणि आवश्यक क्रीडा सुविधा उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या गुणवत्तेला योग्य वाव मिळत नाही. नव्या क्रीडा संकुलाच्या माध्यमातून विविध खेळांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करून स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देण्यावर भर दिला जाणार असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

### संगमनेरला लवकरच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात येणार - आ. खताळ

**आगामी काळात संगमनेर शहरात सर्व शासकीय विभागांमध्ये समन्वय ठेवून राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामुळे संगमनेरला क्रीडा क्षेत्रात नवी ओळख मिळेल. तसेच स्थानिक खेळाडूंना मोठ्या स्पर्धांमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.**

# डीएनएस बँकेला 'ग्रेट प्लेस टू वर्क' प्रमाणपत्र

युवावार्ता (प्रतिनिधी)- संगमनेर - डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेडला (डीएनएस बँक) भारतातील 'ग्रेट प्लेस टू वर्क' संस्थेकडून प्रतिष्ठित 'ग्रेट प्लेस टू वर्क' प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. बँकेच्या ५६ व्या वर्धापन दिनानिमित्त अध्यक्ष ॲड. गणेश धारगळकर यांनी या सन्मानाची घोषणा केली.

नुकत्याच गठीत झालेल्या नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या कार्यकाळातील हा पहिला महत्त्वपूर्ण सन्मान असून, बँकेच्या पुढील वाटचालीसाठी ही सकारात्मक सुरुवात मानली जात आहे. कर्मचाऱ्यांकडून घेण्यात आलेला गोपनीय अभिप्राय आणि त्यांच्या प्रत्यक्ष कार्यानुभवाच्या आधारे हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यामुळे बँकेतील विश्वासाचे वातावरण, सकारात्मक कार्यसंस्कृती आणि कर्मचारीकेंद्री नेतृत्वाची दखल या सन्मानातून घेतली गेली आहे. गेल्या ५६ वर्षांच्या वाटचालीत डीएनएस बँकेने महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात विस्तार करत विश्वास, सहकार, सामूहिक प्रगती आणि सेवाभाव ही मूल्ये जपली आहेत. या यशाबद्दल अध्यक्ष ॲड. गणेश धारगळकर म्हणाले, हा सन्मान डीएनएस बँक परिवारातील प्रत्येक कर्मचाऱ्याच्या समर्पणाला आणि योगदानाला समर्पित आहे. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी विश्राम दीक्षित यांनी सांगितले की, हे प्रमाणपत्र कर्मचाऱ्यांचा संस्थेवरील विश्वास अधोरेखित करणारे आहे. आगामी काळात अधिक नाविन्यपूर्ण, उत्तरदायी आणि ग्राहककेंद्री कार्यसंस्कृती निर्माण करण्यासाठी हा सन्मान प्रेरणादायी ठरेल.

# आता २५ दिवसांनी सिलिंडर बुकिंग




मुंबई (वृत्तसंस्था)

ग्रामीण घरगुती गॅस ग्राहकांसाठी दिलासादायक आणि आनंदाची बातमी आहे. घरगुती गॅस सिलेंडरच्या बुकिंगसंदर्भातील प्रतीक्षा कालावधी कमी करण्यात आल्याने आता ग्राहकांना पूर्वीच्या ४५ दिवसांच्या प्रतीक्षेनंतर नव्हे, तर २५ दिवसांनंतर पुन्हा घरगुती गॅस सिलेंडर बुक करता येणार आहे.

ग्रामीण भागातील अनेक ग्राहकांना गॅस सिलेंडर संपल्यानंतर पुढील सिलेंडरसाठी बुकिंग करण्यास बराच कालावधी प्रतीक्षा करावी लागत होती. त्यामुळे कुटुंबांची गैरसोय होत होती. आता ४५ दिवसांचा कालावधी कमी करून २५ दिवस करण्यात आल्याने नियमित घरगुती गॅस वापरणाऱ्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील कुटुंबे, महिला तसेच नियमितपणे घरगुती गॅसचा वापर करणाऱ्या ग्राहकांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे ग्राहकांना आवश्यकतेनुसार गॅस सिलेंडरचे नियोजन करणे अधिक सोयीचे होणार असून, सिलेंडर संपण्यापूर्वी पुढील सिलेंडरची व्यवस्था करता येणार आहे. गॅस ग्राहकांनी कंपनीच्या नियमांनुसारच सिलेंडरचे बुकिंग करावे, तसेच बुकिंग, वितरण आणि अनुषंगिक बाबींविषयी अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गणेशमूर्तींना अखेरचा हात; आगमनासाठी मूर्तिकारांची लगबग


छाया- विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर -'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात लवकरच गणरायाचे आगमन होणार असल्याने राजूर परिसरातील गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये सध्या लगबग वाढली आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने मूर्तिकार आणि कारागीर गणेशमूर्तींना अंतिम रूप देण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. बाप्पाच्या आगमनापूर्वी प्रत्येक मूर्ती अधिक देखणी, आकर्षक आणि उठावदार करण्यासाठी मूर्तिकारांची धावपळ सुरू आहे.

गणेशमूर्तींच्या प्राथमिक निर्मितीचे काम पूर्ण झाले असून सध्या मूर्तींवर अखेरचा हात फिरविण्याचे काम सुरू आहे. रंगकाम, डोळ्यांची आखणी, मुकुट व फेटे बसविणे, दागदागिने तसेच विविध अलंकारांची सजावट करण्यात कारागीर व्यस्त आहेत. ग्राहकांच्या पसंतीनुसार आकर्षक रंगसंगती, विविध आकार, नक्षीकाम आणि सजावटीचे प्रयोग केले जात असल्याने गणेशमूर्तींना अधिक उठावदार रूप मिळत आहे.

गणेशोत्सव जवळ आल्याने मूर्ती वेळेत पूर्ण करून त्या सुरक्षितपणे ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचे मोठे आव्हान मूर्तिकारांसमोर आहे. बाप्पाच्या आगमनापूर्वी प्रत्येक मूर्ती अधिक देखणी करण्यासाठी आमचा संपूर्ण परिवार कसोशीने काम करीत आहे, असे मूर्तिकार भालेराव यांनी सांगितले.

यंदा गणेशमूर्तींच्या किमतीत सुमारे २० ते २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. माती, रंग, पॅकिंग साहित्य, इंधन, वाहतूक तसेच कारागिरांच्या मजुरीत झालेली वाढ यामुळे मूर्तीनिर्मितीचा खर्च वाढला आहे. त्यामुळे यंदा गणरायाच्या मूर्ती खरेदी करताना ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागत आहेत.

दरम्यान, गेल्या काही वर्षांत प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या तुलनेत शाडूची माती आणि कागदाच्या लगद्यापासून तयार होणाऱ्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना मागणी वाढत आहे. मात्र पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल, रंग आणि इतर साहित्य महागल्याने त्यांचाही उत्पादन खर्च वाढला आहे.

मूर्तींच्या रंगकामासाठी लागणारे रंग, सजावटीचे साहित्य, प्लॅस्टिक तसेच पॅकिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिक शिटच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. पॅकिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिक शिटची किंमत प्रतिकिलो १६० रुपयांवरून २२० रुपयांपर्यंत वाढल्याने त्याचाही अतिरिक्त भार मूर्तिकारांवर पडला आहे.

महागाईचा फटका बसत असला तरी भक्तांच्या उत्साहात मात्र कोणतीही कमतरता नसून, बाप्पाच्या आगमनासाठी मूर्तिकारांबरोबरच ग्राहकही आतुर झाले आहेत.

# उमाजी नाईकांच्या पराक्रमाचा इतिहास उलगडला

## प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांचे ओजस्वी व्याख्यान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अन्याय, शोषण आणि परकीय सत्तेविरुद्ध स्वाभिमानाची मशाल पेटविणारे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त सायखिंडी येथे विविध उपक्रमांनी प्रेरणादायी जयंती सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

या जयंती सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते प्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांच्या ओजस्वी आणि प्रेरणादायी व्याख्यानाचे. आपल्या प्रभावी वक्तृत्वातून त्यांनी राजे उमाजी नाईक यांच्या शौर्य, पराक्रम, स्वाभिमान आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा इतिहास उपस्थितांसमोर उलगडला.

उमाजी नाईक यांनी केवळ इंग्रजी सत्तेविरुद्धच संघर्ष केला नाही, तर अन्याय, शोषण, असमानता आणि जमीनदारशाहीविरुद्धही त्यांनी आवाज उठविला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी इंग्रजी सत्तेला अनेक वर्षे आव्हान देत जनतेमध्ये स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जाणीव निर्माण केली, असे प्रा. बानगुडे-पाटील यांनी सांगितले.

सन १७९१ मध्ये पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे जन्मलेल्या उमाजी नाईक यांच्या संघर्षाला भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. गुलामगिरी स्वीकारण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणे श्रेष्ठ आहे, हा त्यांच्या विचारांचा गाभा आजच्या पिढीसाठीही तितकाच प्रेरणादायी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे, सामाजिक विषमता दूर करणे आणि प्रत्येक व्यक्तीला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे, हा उमाजी नाईक यांच्या संघर्षाचा व्यापक सामाजिक आशय होता. त्यामुळे त्यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि संघर्षाचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

राजे उमाजी नाईक उत्सव समितीच्या वतीने तसेच आयोजक महेशभाऊ गोफणे, नितीनभाऊ बोऱ्हाडे आणि जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सुंदर, शिस्तबद्ध व भव्य सोहळ्याचे आयोजन केले. या आयोजनाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यक्रमास डॉ. जयश्रीताई थोरात, अजयजी फटांगरे, प्रा. बाबा खरात सर, सीताराम राऊत यांच्यासह गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच परिसरातील विविध गावांमधून आलेले मान्यवर व पाहुणे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनलक्ष्मी पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

## संस्थेकडे २८१ कोटींच्या ठेवी, एनपीए शून्य टक्के

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : ठेवीदारांनी आपल्या कष्टाची कमाई अधिक व्याजाच्या आमिषाला भुलून कुठेही गुंतवणूक न करता विश्वासार्ह व सुरक्षित संस्थांमध्येच ठेवी ठेवाव्यात, असे आवाहन जनलक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब नवले यांनी केले.

जनलक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब नवले यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी संचालक मंडळाचे सदस्य, सभासद, ठेवीदार, कर्मचारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा देताना अध्यक्ष नवले यांनी सांगितले की, संस्थेकडे सध्या सुमारे २८१ कोटी रुपयांच्या ठेवी असून, १९९ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. संस्थेची गुंतवणूक सुमारे १३४ कोटी रुपये असून, संस्थेला ९ कोटी रुपयांचा नफा झाला आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल सुमारे ३ हजार कोटी रुपये असून, संस्थेचा एनपीए शून्य टक्के असल्याचे त्यांनी नमूद केले.

जनलक्ष्मी पतसंस्थेची मुख्य इमारत तसेच सर्व शाखांच्या इमारती स्वतःच्या मालकीच्या आहेत. अकोले बाजारपेठेत शेतकरी व ग्राहकांच्या सोयीसाठी संस्थेच्या वतीने आरओ पाणी प्रकल्प उभारण्यात आला आहे. सभासद व ठेवीदारांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात असल्याचेही नवले यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्ष नवले म्हणाले, ठेवी वाढविणे हीच पतसंस्थेची खरी कामगिरी नाही, तर ठेवीदारांचा विश्वास कायम टिकविणे हे अधिक महत्त्वाचे आहे. सभासदांनी संस्थेवर विश्वास ठेवावा. त्यांच्या ठेवी सुरक्षित असून, गरजेच्या वेळी ठेवीदारांना पैसे उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सदैव तत्पर आहे.

सभेदरम्यान संस्थेच्या विविध कामकाजाचा व आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. उपस्थित सभासद व ठेवीदारांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. संपूर्ण सभा उत्साही व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# नूतन महाविद्यालय राजापूरमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर - प्रगतिशील शिक्षण संस्थेचे नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजापूर येथे ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध उपक्रमांतून शिक्षक दिनाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाची सुरुवात कु. राजनंदिनी घुले यांच्या स्वागताने झाली. कु. सायली आवारी यांनी अध्यक्षीय निवेदन केले. त्यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. तेजस हासे यांनी केले. यावेळी शिक्षकांचा सत्कार विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून कु. ओम कळसकर, कु. संचिता हासे, कु. श्रुती कोकणे आणि कु. राजनंदिनी घुले यांनी शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व, त्यांचे मार्गदर्शन आणि योगदान याबद्दल भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. बाबासाहेब वर्पे सर यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून आपल्या जीवनात यशस्वी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. सिद्धी उदावत यांनी केले. विद्यार्थी व शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

# 'काळी आई'च्या कुशीत विठ्ठलाचे रूप

## आसावा फार्मचा अनोखा कृषी प्रयोग

युवावार्ता (प्रतिनिधी)

चणेगाव- 'शेती हीच पंढरी आणि काळी आई हीच विठाई' या भावनेला कृतीची जोड देत कृषीभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी डॉ. विठ्ठलदास बालकिसन आसावा यांनी आपल्या शेतात धैंचा पिकातून श्री विठ्ठलाची अनोखी सजीव प्रतिकृती साकारली आहे. चणेगाव येथील कृषी पंढरी आसावा फार्मच्या गट क्रमांक ३८३ मध्ये १ हेक्टर ६५ आर म्हणजेच १६ हजार ३८० चौरस मीटर क्षेत्रात ही हिरवीगार कलाकृती साकारण्यात आली आहे.

पूर्व-पश्चिम १९५ मीटर लांब आणि दक्षिण-उत्तर ८५ मीटर रुंद क्षेत्रात धैंचा पिकाच्या माध्यमातून विठ्ठलाची प्रतिमा साकारण्यात आली आहे. दूरवरून पाहिल्यास हिरव्यागार शेतामध्ये प्रत्यक्ष विठ्ठल उभा असल्याचा भास होतो. कृष्ण जन्माष्टमीच्या पार्श्वभूमीवर साकारण्यात आलेली ही अनोखी हिरवी विठ्ठलाकृती परिसरातील शेतकरी आणि भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

'खतासाठी रांगेत उभे राहण्यापेक्षा खतालाच शेतात उभे करा' या उपक्रमामागे केवळ धार्मिक कलाकृती साकारण्याचा उद्देश नसून हिरवळीच्या खताचे महत्त्व, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत शेतीचा संदेश शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे.

'खतासाठी रांगेत उभे राहण्यापेक्षा, खतालाच शेतात उभे करावे,' असा संदेश डॉ. आसावा यांनी या प्रयोगातून दिला आहे. धैंचा पिकाचा हिरवळीचे खत म्हणून वापर केल्याने जमिनीतील सेंद्रिय घटक वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर जमिनीची सुपीकता टिकविणे, मृदास्वास्थ्य सुधारणे आणि शाश्वत शेतीला चालना देणे शक्य होते.

डॉ. आसावा यांच्या नावातील 'विठ्ठल' आणि शेतीशी असलेले त्यांचे अतूट नाते या कलाकृतीतून अधोरेखित झाले आहे. केवळ उत्पादन वाढविण्यावर भर न देता मातीचे आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि शेतकऱ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी ते सातत्याने विविध कृषी प्रयोग राबवत असतात. त्याच भूमिकेतून धैंचा पिकातून साकारलेला विठ्ठल हा प्रयोग कृषी क्षेत्रात चर्चेचा विषय ठरला आहे.



या अभिनव उपक्रमासाठी कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांची प्रेरणा, तर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच ऊस विकास विभाग, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना यांचे तांत्रिक सहकार्य मिळाले.

# जलसंपदा विभागाने शेतीच्या पाणी आवर्तनाचे योग्य नियोजन करावे - पालकमंत्री डॉ. विखे पाटील

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - शेतकऱ्यांना योग्य वेळेत पाणी मिळेल यासाठी जलसंपदा विभागाने पाण्याचे योग्य नियोजन करून आवर्तनाचे वेळापत्रक तयार करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. भविष्यात पाण्याची समस्या उद्भवू नये यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकरी बांधवांना केले.



प्रवरा आणि गोदावरी लाभक्षेत्रातील पाण्याची सद्यस्थिती, शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मागण्या आणि सिंचन नियोजनाबाबत जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय सभागृहात समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले.

धरणे भरलेली असली तरी पाऊस लांबल्यामुळे निर्माण झालेल्या पाणी आव्हानांवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, आमदार अमोल खताळ, जलसंपदा विभागाचे अभियंता गोवर्धने, कार्यकारी अभियंता सोनाली शहाणे, स्वप्नील काळे, सायली पाटील यांच्यासह विविध राजकीय प्रतिनिधी म्हणून नितीन दिनकर,कपिल पवार, डॉ. भास्करराव खर्डे, शिवाजीराव जोंधळे, कैलास तांबे, आबासाहेब थोरात, गणेश कारखान्याचे माजी चेअरमन मुकुंदराव सदाफळ, बापूसाहेब देशमुख, यांची उपस्थिती होती

भंडारदरा, निळवंडे आणि गोदावरी धरणांमधून उपलब्ध पाण्यावर आवर्तनाचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच नदीपात्रातून होत असलेल्या बेकायदेशीर वाळू उपशाबाबत मंत्री विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना खबरदारी घेण्याचे निर्देश दिले. जलसंपदा विभागाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आवश्यक असून नियमांचा कठोर आधार घेऊन तातडीने कडक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले. बैठकीत शेतकऱ्यांनी विजेच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले. यावर प्रतिक्रिया देताना मंत्री विखे पाटील यांनी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेऊन भारनियमनाच्या समस्येवर तातडीने मार्ग काढण्याचे व शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे आश्वासन दिले.

# हरेगाव मतमाऊली यात्रेनिमित ऑल इंडिया ख्रिशन फोरमच्यावतीने जनजागृती अभियान - भोसले

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पंथ सारे विसरून जाऊ ख्रिस्ती सारे एक होऊ या ब्रीदवाक्याखाली ऑल इंडिया ख्रिशन फोरमच्या माध्यमातून देशात ख्रिस्ती समाजाचे संघटन मजबूत करण्यासाठी देशभरात ख्याती असलेल्या हरेगाव येथील मतमाउली यात्रा सोहळ्या निमित्ताने गेल्या पंधरा वर्षापासून सुरू करण्यात आलेले जनजागृती अभियान यावर्षीही १२ ते १३ सप्टेंबर २०२६ रोजी राबविण्यात येणार असल्याची माहिती ऑल इंडिया ख्रिशन फोरमचे उपसंचालक अनिल भोसले यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.



श्री.भोसले पुढे म्हणाले की,ख्रिस्ती समाजातील विविध क्षेत्रातील समस्या सोडवणुकीच्या दृष्टीने गावपातळी पासून ते देश पातळीवर कार्यरत असणाऱ्या विविध संघटनांनी एकत्र येऊन सकारात्मक समन्वयाची भूमिका घेऊन एक व्यासपीठ निर्माण करण्यासाठी फोरमच्या माध्यमातून पुढाकार घेऊन जनजागृती अभिनयाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास साधण्यासाठी बेरोजगार युवकांना मार्गदर्शन करून त्यांच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून ठोस पाऊल उचलण्यात येणार येणार आहे, विविध प्रशिक्षण शिबिरातून युवक युवतींच्या सुप्तगुणांना वाव देणे, अन्याय निवारणासाठी प्रयत्न, महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहन देणे, तळागाळातील लोकांमध्ये जागृती करून त्यांच्यामधे नेतृत्व विकास करणे, वर्षभरात राज्यस्तरीय मेळावे, चिंतन शिबिरे व धार्मिक सभेचे आयोजन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

यावेळी, ऑल इंडिया ख्रिशन फोरमचे संचालक दिलीप नाईक, फा.सतीश कदम,प्रफुल्ल असुरलेकर,माध्यम सल्लागार प्रमुख सालोमन गायकवाड, प्रा.बाबा खरात,अविनाश काळे, प्रवीणराजे शिंदे, रंजन साळवी,आदी मार्गदर्शन करणार आहेत.

या अभियानामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन फोरम चे जिल्हाध्यक्ष दीपक कदम, चंद्रकांत ऊजागरे, फिलिप पंडित, किरण चांदेकर, आंतोन भोसले, सचिन बोरुडे, प्रकाश लोखंडे,आशिष बनसोडे, मार्कस बोर्डे, अजित सुडगे, भाऊसाहेब तोरणे, जेम्स पंडित, डॉ.राजू साळवे, निशिकांत पंडित, सुरेश ठुबे, सचिन रूपटक्के, सुभाष बोधक, विश्वास अमोलिक, विलास पठारे, राजेश दुशिंग, राजेंद्र भोसले, बबलू लोंढे, सुरेश गायकवाड, प्रभाकर चांदेकर, सिमोन रुपटक्के, भाऊसाहेब नेटके, संदीप हिवाळे, विजय त्रिभुवन,आदींनी केले आहे.

# उमाजी नाईक : स्वाभिमानाची धग आणि स्वातंत्र्यलढ्याची पहिली वज्रमूठ !

**लखलख चमचम तळपत होती उमाजींची तलवार;**

**महाराष्ट्राला घडविणारे तेच खरे शिल्पकार!**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास केवळ दिल्लीच्या राजकारणात किंवा मोठ्या युद्धांच्या पानांमध्ये शोधून चालणार नाही. या मातीत परकीय सत्तेविरुद्ध सर्वस्व पणाला लावून लढणाऱ्या असंख्य वीरांच्या रक्ताने स्वातंत्र्याची पायाभरणी झाली आहे. अशाच स्वाभिमानी, धाडसी, संघटक आणि मानवतावादी क्रांतिकारकांमध्ये राजे उमाजी नाईक यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

७ सप्टेंबर १७९१ज्ञ रोजी जन्मलेल्या उमाजी नाईकांच्या व्यक्तिमत्त्वाला बालपणापासूनच शौर्य, स्वाभिमान आणि मातृभूमीवरील निष्ठेची शिकवण मिळाली. पुरंदरच्या परिसराशी त्यांचे जीवन घट्ट जोडलेले होते. त्यांच्या कुळावर असलेली किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी आणि स्वराज्याची परंपरा त्यांच्या रक्तातच भिनलेली होती.

**शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी;उमाजी राजे जन्मले, माता लक्ष्मीच्या पोटी!**

आई-वडिलांची शिकवण, डोंगर-दऱ्यांतील अनुभव आणि समाजजीवनाचे भान या त्रिसूत्रीवर उमाजींच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. जेजुरीच्या खंडेरायावरील त्यांची श्रद्धा आणि भगव्या ध्वजाविषयीची निष्ठा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होती.

१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला आणि इंग्रज सत्तेचा प्रभाव वाढू लागला. परकीय सत्ता आपल्या भूमीवर पाय रोवत आहे, गरीब जनतेवर अन्याय होत आहे, आपल्या माणसांच्याच हातून आपल्या बांधवांची लूट होत आहे, ही वेदना उमाजींच्या मनात अस्वस्थता निर्माण करू लागली.ही अस्वस्थता त्यांनी केवळ शब्दांत व्यक्त केली नाही; तर तिला कृतीची दिशा दिली.



डोंगर-दऱ्यांतील लढाऊ तरुणांना संघटित करून त्यांनी इंग्रज सत्तेविरुद्ध संघर्ष उभारला. इंग्रजांकडून मिळालेला पैसा लुटून तो गरजू आणि गरीब जनतेच्या उपयोगी आणण्याची त्यांची भूमिका होती. त्यामुळे उमाजी नाईक हे केवळ सशस्त्र बंडाचे नेतृत्व करणारे योद्धे नव्हते, तर शोषितांच्या वेदनेशी नाते जोडणारे लोकनायक होते. गनिमी कावा, हेरगिरी, संघटनकौशल्य आणि धाडसी निर्णय यांच्या जोरावर त्यांनी इंग्रज प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे केले. त्यांचा प्रभाव वाढत गेला तसतशी इंग्रजांची चिंता वाढली. उमाजींना पकडण्यासाठी बक्षिसे जाहीर झाली; फितुरीचे डाव रचले गेले; तह आणि माफीच्या माध्यमातून त्यांना नियंत्रित करण्याचे प्रयत्न झाले. मात्र स्वातंत्र्याची आस असलेला हा स्वाभिमानी योद्धा परकीय सत्तेच्या बंधनात रमणारा नव्हता.

**विश्वासघाताने पकडला गेला, पण विचार कधीच कैद झाले नाहीत!**

इतिहासातील सर्वात वेदनादायी प्रसंग म्हणजे उमाजी नाईकांना आपल्याच लोकांच्या फितुरीमुळे पकडण्यात आले. इंग्रजांनी त्यांना पुण्यात आणले. खटला चालवला गेला आणि अखेर ३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुण्यात त्यांना फाशी देण्यात आली.वयाच्या अवघ्या ४३व्या वर्षी उमाजी नाईकांनी हसत हसत मृत्यूला कवटाळले. त्यांचे शरीर संपले; पण त्यांच्या विचारांची मशाल विझली नाही.

**मरावे परी क्रांतीरूपी उरावे, या उक्तीचा जिवंत प्रत्यय त्यांच्या बलिदानातून येतो.**

उमाजी नाईकांचा संघर्ष हा केवळ एका व्यक्तीचा किंवा एका समाजाचा संघर्ष नव्हता. तो स्वाभिमानाचा, अन्यायाविरुद्धच्या प्रतिकाराचा आणि मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा संघर्ष होता. म्हणूनच त्यांना एका जातीत किंवा एका समूहाच्या चौकटीत बंदिस्त करणे म्हणजे त्यांच्या व्यापक कार्याचा संकोच करणे होय.

**आजच्या पिढीने उमाजींकडून काय शिकावे?**

आज आपण स्वातंत्र्याच्या अमृतकाळात जगत आहोत. परिस्थिती बदलली आहे; परकीय सत्ता नाही. मात्र अन्याय, शोषण, सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, भ्रष्टाचार आणि माणसामाणसातील दुरावा यांसारखी आव्हाने आजही आपल्या समोर आहेत. उमाजी नाईकांचे जीवन आपल्याला सांगते की, अन्याय दिसला तर शांत बसू नका; समाजासाठी उभे राहा. स्वाभिमान जपा; पण मानवतेचा हात सोडू नका. त्यांच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे संघटन. एकट्या माणसाचे धैर्य मोठे असते; पण सजग, संघटित समाजाची ताकद त्याहून मोठी असते. त्यामुळे आजच्या तरुणाईने उमाजींच्या शौर्याबरोबरच त्यांचे संघटनकौशल्य, त्याग, निर्भयता आणि समाजहिताची भावना आत्मसात करण्याची गरज आहे.

७ सप्टेंबर रोजी राजे उमाजी नाईकांची जयंती साजरी होत असताना त्यांच्या कार्याचे स्मरण केवळ मिरवणुका, घोषणाबाजी किंवा पुष्पहारापुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या इतिहासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास व्हावा, शाळा-महाविद्यालयांमध्ये त्यांच्या कार्यावर व्याख्याने, परिसंवाद आणि वाचन उपक्रम व्हावेत, त्यांच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि नव्या पिढीला या क्रांतिकारकाची खरी ओळख व्हावी, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या नावाने आर्थिक विकास महामंडळाची स्थापना होणे ही निश्चितच आनंदाची आणि आशादायी बाब आहे. मात्र कोणत्याही महापुरुषाच्या नावाला खरा न्याय मिळतो तो त्यांच्या समाजातील शेवटच्या घटकाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणल्याने.उमाजी नाईकांनी तलवार हातात घेतली ती सत्ता मिळवण्यासाठी नव्हे; तर स्वाभिमान आणि न्यायासाठी. म्हणून त्यांच्या नावाचा जयघोष करताना त्यांच्या विचारांची मशालही पुढे नेणे हीच खरी जबाबदारी आहे.

**उमाजी एका समाजाचे नव्हे, तर मानवतेचे नायक!**

महापुरुषांना जात, धर्म, प्रांत किंवा राजकीय चौकटीत अडकवण्याची प्रवृत्ती आपण सोडली पाहिजे. उमाजी नाईकांचा संघर्ष हा माणसाच्या स्वातंत्र्यासाठी होता. गरिबांविषयीची त्यांची कळकळ, अन्यायाविरुद्धचा त्यांचा संघर्ष आणि मातृभूमीवरील त्यांची निष्ठा ही संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण एवढीच प्रतिज्ञा करूया- अन्यायाविरुद्ध आवाज उठवू,

**समाजातील दुर्बलांच्या पाठीशी उभे राहू,**

**स्वाभिमानाने जगू आणि मानवतेला सर्वोच्च स्थान देऊ!**

राजे उमाजी नाईक हे इतिहासातील केवळ एक नाव नाही; ते अन्यायाविरुद्ध पेटलेली ठिणगी, स्वाभिमानाची मशाल आणि क्रांतीची वज्रमूठ* आहेत.

**त्यांच्या चरणी मानाचा त्रिवार मुजरा!**

**– संजय राजाराम जेडगुले**

**सायखिंडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग
### कार्यकारी अभियंता, नाशिक विद्युत विभाग यांचे कार्यालय,
### २ रा मजला, ग्रीन बिल्डींग, सा. बां. परिसर, ऊंटवाडी रोड, नाशिक-४२२००२.
### ई-मेल :- elnashik.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्र. ०२५३-२५७८०१२.
### दरपत्रक सूचना क्र. ०४ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, नाशिक दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५७८०१२ हे खालील बाबीचे अंदाजपत्रक तयार करणेसाठी मुळ उत्पादक अथवा अधिकृत वितरक यांचेकडुन दरपत्रक मागवित आहे. सदर दरपत्रक या कार्यालयात दिनांक ०८.०९.२०२६ ते १५.०५.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात सादर करण्यांत यावेत.

| Sr. No. | Description and Specification of Item | Approximate Qty | Unit | Rate per Unit (Rs.) |
|---|---|---|---|---|
स्पर्धेत इयत्ता ५ वी ते ७ वी (गट १) आणि ८ वी ते १० वी (गट २) अशा दोन गटांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये रंगतदार चुरस पाहायला मिळाली. विद्यार्थ्यांनी पदार्थांच्या चवीसोबतच स्वच्छता, पौष्टिकता आणि आकर्षक सादरीकरणावर भर दिला. परीक्षणानंतर बोलताना प्रदीप गुंजाळ पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून कठोर परिश्रम, चिकाटी आणि कल्पकतेच्या जोरावर भविष्यात यशस्वी होण्याचे आवाहन केले. अनुज देशमुख यांनी अन्नाची निवड, स्वच्छता व सादरीकरणाबाबत मार्गदर्शन करत खाद्यसंस्कृतीतील नाविन्यता आणि पाककौशल्यातील व्यावसायिक संधींची माहिती दिली. निलेश गायकर यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आहाराविषयी सजगतेसोबतच सांघिक भावना, शिस्त, सहकार्य व नेतृत्वगुण विकसित होतात, असे सांगितले.

# साहेबराव केशवराव देशमुख यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - संभोडी, प्रवरा तीरी (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथील साहेबराव केशवराव देशमुख यांचे दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने देशमुख परिवारावर शोककळा पसरली असून, नातेवाईक, आप्तेष्ट व मित्रपरिवारातून हळहळ व्यक्त होत आहे.



साहेबराव देशमुख हे प्रेमळ, मनमिळावू आणि आपुलकीचा स्वभाव असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांनी एक जिव्हाळ्याचा आधार गमावला आहे. त्यांच्या आठवणी सदैव स्मरणात राहतील.

त्यांच्या पश्चात मुलगा अक्षय साहेबराव देशमुख, मुली सौ. उज्वला भारत देशमुख व सौ. साधना सचिन देशमुख, भाऊ गुलाबराव केशवराव देशमुख व श्री. विजयराव केशवराव देशमुख, बहीण यमुना पुंडलिकराव शिंदे, तसेच चुलत भाऊ-बहिणी, वहिनी, पुतणी आणि मोठा आप्तेष्ट परिवार आहे.

त्यांच्यावर रूंभोडी, प्रवरा तीरी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ईश्वर त्यांच्या दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो आणि देशमुख परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.


## संगमनेर मेडीकल फाउंडेशन & रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित

## डॉ. इथापे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, संगमनेर

मु. वेल्हाळे, पो. राजापुर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर ४२२६०५
मो. नं. 8182940940, 9764489091, 7588004890
E-Mail – ithapeinstitute2019@gmail.com
Approved by PCI, DTE, DBATU, & Govt. of Maharashtra

### थेट द्वितीय वर्ष बी.फार्मसी प्रवेश सूचना (Spot Round)

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ थेट द्वितीय वर्ष बी.फार्मसीच्या संस्थास्तरावरील (Institute Level) प्रवेशाकरिता व कॅप राउंड नंतर रिक्त राहणाऱ्या जागांसाठी कॉलेज स्तरावरील प्रवेशाकरिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली सर्व ओरीजनल कागदपत्रे घेऊन महाविद्यालयात त्वरीत संपर्क साधावा

**DTE Code: 5482**

| अ.क्र. | कार्यप्रणाली | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज प्रवेशपत्र स्विकारणे | 07/08/2026 ते 08/09/2026 |
| 2 | नोंदणीकृत उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची अंतिम तारीख | 09/09/2026 ते 14/09/2026 up to 3.00 pm |
| 3 | गुणवत्ता यादी तयार करून ती कॉलेजच्या वेबसाइटवर आणि संस्थेच्या सूचनाफलकावर प्रदर्शित करण्याची अंतिम तारीख | 14/09/2026 up to 5.00 pm |
| 4 | प्रवेश घेण्याची अंतिम तारीख | 15/09/2026 |

**अध्यक्ष**
संगमनेर मेडीकल फाउंडेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट ,
संगमनेर



## पाहिजेत

कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)



## पाहिजेत

ऑफिस बॉय (प्युन)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
स्वतःचे वाहन आवश्यक
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा



## फ्लॅट विकणे आहे

- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड,
पर्पल ब्लुम सोसायटी,
साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर,
1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड,
सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718


## प्रतिज्ञापत्र

मे. नोटरी साहेब, कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर प्रतीआर टी ओ ऑफीस श्रीरामपूर यांचे कडेस या कामी सौ. रोहिणी धोंडीभाऊ वाघुले वय ४५ , धंदा घर काम रा. माहुली ता. संगमनेर जिः अहील्यानगर, सत्य प्रतिज्ञा पत्र करते की, वरील ठिकाणची रहिवासी असून आझा मुलगा प्रसाद धोंडीभाऊ वाघुले त्यांच्या नावावर महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी बोलेरो पिकअप व्हॅन त्याचा रजिस्टेशन न-MH-17-CV 3273 त्याचा चॅसी नंबर MAIZN2TTKR6G 36249. इंजिन न TTR-4F 32754 असे असून त्याचे रजिस्ट्रेशन RTO श्रीरामपूर येथे 29/10/2024 झालेले आहे. माझा मुलगा याने 24/10/2025 रोजी मयत झालेला असून तो अविवाहित होता. वरील नमुद वाहन हे माझ्या नावावर वारस या नात्याने होणेसाठी सदरचे प्रतिज्ञापत्र केले आहे.तसेच माझ्या मुलाचे माझ्या व्यतिरिक्त त्याचे वडील म्हणजे माझे पती हे धोंडीभाऊ रखमा वाघुले तसेच माझी मुलगी सौ. स्नेहल भारती गाडेकर व सौ निकिता राहुल निधाने त्यांच्याकडून माझ्या नावावर गाडी करण्यास कोणती हरकत नाही. तरी वरील नमूद पिकअप व्हॅन माझ्या नावावर ट्रान्स्फर करण्यासाठी सदरचे प्रतिज्ञा पत्र केले आहे. वरील मजकूर व माहिती खरी आहे. त्यामध्ये चुकीचे आढळून आल्यास मी भा. न्या. स. कलम 236-237 नुसार जबाबदार आहे याची मला जाणीव आहे.

**प्रतिज्ञापत्र - सौ. रोहिणी धोंडीबा वाघुले**


FinanCity
STOP THINKING START INVESTING

## उत्कृष्ट करिअर संधी तुमच्यासाठी !

उत्तम संधी, उत्तम करिअर आणि उज्वल भविष्य तुमच्या प्रतीक्षेत आहे
१२ सप्टेंबरपर्यंत मुलाखत सुरू आहे

**बँक ऑफिस - २५ जागा (महिला)**
डेटा एन्ट्री व डॉक्युमेंटेशन रिपोर्ट तयार करणे, ऑफिस सपोर्टची कामे
पात्रता - कोणत्याही शाखेतील पदवीधर

**ॲडमिन / एचआर - २ जागा (महिला)**
प्रशासकीय कामे, कर्मचारी समन्वय, एचआर संबंधित कागदपत्रे
पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर

**फिल्ड वर्क सेल्स मॅनेजर- ५ जागा (पुरुष)**
फिल्ड भेटी व ग्राहक संपर्क, नवीन ग्राहक जोडणे, सेल्स टार्गेट पूर्ण करणे
पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर

**FINANCITY सोबत करिअर का घडवावे?**
आकर्षक पगार व कमिशन,करिअर मध्ये वाढीच्या संधी, मैत्रीपूर्ण कामाचे वातावरण, स्थैर्य आणि सुरक्षित भविष्य, परफॉर्मन्सवर आधारित प्रोत्साहन

अधिक माहितीसाठी संपर्क करा
7208095977 / 9623532907
फायनान्स सिटी, नेअर ग्रेव्ही यार्ड हॉटेल, अकोले बायपास रोड, संगमनेर



CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
BUSHRA CHAND SAYYAD
NEW NAME AS
BUSHARA CHAND SAYYAD
ADDRESS - CHASNALI
TAL - KOPARGAON
DIST - A NAGAR PIN - 423604



CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHAIKH KHALIL SH. ABBAS PATEL
NEW NAME AS
KHALIL ABBAS SHAIKH
AT POST - KURAN
TAL- SANGAMNER
DIST - AHILYANAGAR



## पाहिजेत

मेडिकल दुकानासाठी
महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड,
ताजने मळी, संगमनेर
- संपर्क -
9921245753



## जागा विकणे आहे

अतिशय उत्तम लोकेशन मधील
मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी
लगतची तहसील N. A. व
सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे
उत्तरमुखी रहिवाशी चौरस
जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212



## पाहिजेत

सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747



## भाड्याने देणे आहे

सर्व सुविधायुक्त
०१ बीएचके
रो - हाऊस
भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818



SR THORAT

JOB

GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com








## पाहिजेत

सोनोग्राफी सेंटरसाठी
मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी
टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862



## पाहिजेत

स्पेशल सिक्युरिटी फोर्स
व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम
मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक,
मालदाड रोड, संगमनेर
7709828846



## नोकरीची सुवर्णसंधी

श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री
क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५९



## पाहिजेत

जानकीराम गंगाधर काजळे
ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

# महायुतीकडून संगमनेरात सीसीटीव्हीचे लोकार्पण

## पालकमंत्री व आमदार खताळ यांच्या प्रयत्नातून मिळाला निधी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महिलांची सुरक्षितता अधिक मजबूत करण्याबरोबरच शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालणे आणि कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने संगमनेर शहरातील प्रमुख चौक तसेच अति संवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा उभारण्यात आली आहे. या सी सी टीव्ही कॅमेऱ्याचे लोकार्पण महायुतीच्या पदाधिकाऱ्यां च्या हस्ते सोमवारी सकाळी करण्यात आली

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून ही यंत्रणा उभारण्यात आली आहे. संगमनेर शहरात वाढत्या लोकसंख्येबरोबरच वाहनांची वर्दळ आणि नागरिकांची ये-जा वाढली आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख चौक तसेच अतिसंवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची आवश्यकता असल्याची बाब आमदार अमोल खताळ यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली होती. महिला सुरक्षितता, चोरीच्या घटनांना आळा घालणे तसेच कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा उपयुक्त ठरणार असल्याचे सांगत त्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

आमदार खताळ यांच्या मागणीची दखल घेत पालकमंत्री विखे-पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सुमारे ९९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. या निधीतून शहरातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा उभारण्यात आली आहे.

अकोले नाका, त्रिमूर्ती चौक, जनता नगर कॉर्नर, बसस्थानक कॉर्नर, चावडी चौक, तीन बत्ती चौक, चंद्रशेखर चौक तसेच नगरपालिकेच्या न्यायालयीन इमारतीजवळील परिसर आदी ठिकाणी ही यंत्रणा उभारण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख मार्ग आणि संवेदनशील भाग सीसीटीव्हीच्या निगराणीखाली येण्यास मदत होणार आहे.

शहरात चोरी, छेडछाड, अपघात अथवा अन्य गुन्हेगारी घटना घडल्यास संबंधित घटनेचा तपास करण्यासाठी पोलिसांना सीसीटीव्ही फुटेजचा उपयोग होणार आहे. तसेच प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित झाल्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींवर प्रतिबंधात्मक परिणाम होऊन नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, सोमवारी सकाळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी या सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेचे उद्घाटन केले. शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याबद्दल महायुतीच्या कार्यकर्त्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले.

# सुधीर गोसावी यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शहरातील जनतानगर येथील रहिवासी सुधीर भाऊसाहेब गोसावी यांचे दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने गोसावी परिवारासह नातेवाईक, मित्रपरिवार व परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे.

सुधीर गोसावी हे प्रेमळ, मनमिळाऊ आणि आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. आपल्या साध्या, हसतमुख आणि जिव्हाळ्याच्या स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या अकाली जाण्याने परिवारावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला असून, त्यांच्या सहवासातील असंख्य आठवणी आता कायम स्मरणात राहणार आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी, आई, दोन भाऊ, एक बहीण आणि दोन मुली असा परिवार आहे.

कुटुंबासाठी आधारवड असलेल्या सुधीर गोसावी यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही. त्यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरांतून हळहळ व्यक्त होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि गोसावी परिवारास हे अपरिमित दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# देशाच्या न्यायव्यवस्थेत 'नारीशक्ती'चा नवा अध्याय

मुंबई (वृत्तसंस्था)

भारतात सुप्रीम कोर्टात सरन्यायाधीश पद अद्याप कोणत्याही महिलेने भूषवलेले नाही. आता लवकरच भारताची ७५ वर्षांची प्रतिक्षा संपुष्टात येणार आहे. कारण सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीश म्हणून बी.वी. नागरत्ना यांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे. ज्येष्ठता क्रमानुसार विक्रम नाथ यांच्यानंतर आता न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना यांची नियुक्ती होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बी. व्ही. नागरत्ना यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९६२ रोजी बेंगळुरूमध्ये झाला. त्यांनी के जीसस अँड मेरी कॉलेजमध्ये बीएचे शिक्षण पूर्ण केलं. पुढे १९८७ साली दिल्ली विद्यापीठातून एलएलबीचे शिक्षण पूर्ण केलं. त्यांनी १९८७ साली वकिली सुरू केली. न्यायमूर्ती नागरत्ना यांचे वडील ई. एस. व्यंकटरमैया हे सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश होऊन गेले आहेत. त्यांनी १९ जून १९८९ ते डिसेंबर १९८९ या कालावधित सरन्यायाधीश पद भूषवलं. ते सुप्रीम कोर्टाचे १९वे सरन्यायाधीश ठरले.

## पान १ वरून - दोनशे सीसीटीव्हीच्या...

तेव्हापासून आजपर्यंत नगरपरिषदेची वाटचाल अत्यंत सुंदर झाली आहे. अनेक वर्षांपासूनचे प्रश्न आपण सोडवले आहेत. निळवंडे धरणाचे दोन्ही कालवे आणि थेट पाईपलाईनमुळे शहराला मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे. ग्रामीण भागातील शेतीला पाणी मिळाल्याने भाजीपाला उत्पादन वाढत असून त्याचा फायदा संगमनेरच्या बाजारपेठेलाही होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांना चांगल्या सुविधा देतानाच सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता आणि चांगले रस्ते याकडेही नगरपरिषदेने लक्ष द्यावे. शहरात भूमिगत वीजवाहिन्यांचे जाळे निर्माण करण्याचा विचार करावा. चांगले काम करताना अडथळे येतील; मात्र त्याकडे दुर्लक्ष करून काम सुरू ठेवावे, असे आवाहन थोरात यांनी केले. शहराच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही व्यवस्था सुरू झाली असताना या कार्यक्रमाला पोलिस प्रशासनाची उपस्थिती नसणे हे न उलगडणारे कोडे असल्याचेही त्यांनी नमूद केले. आमदार सत्यजित तांबे म्हणाले, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी राबविलेल्या थेट पाईपलाईन योजनेमुळे संगमनेरला आज मुबलक पाणी मिळत आहे. शहरात अत्याधुनिक दर्जाचे २०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यासाठी जिल्हा नियोजन समिती व पालकमंत्र्यांचे आभार. नगरपालिकेसाठी मंजूर झालेला निधी अन्य विभागाकडे वळविण्यात आल्याचा आरोप करत तांबे म्हणाले, शहरात विकासकामे होत असताना आम्ही अडथळा आणला नाही. उलट एक मिनिटात ना हरकत प्रमाणपत्र दिले. त्यामुळे न आणलेल्या निधीचे आणि न केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये. निधी कसा आणायचा हे आम्हाला चांगले माहीत आहे. आम्ही निधी आणत राहू आणि विकासकामे करत राहू.

दुर्गाताई तांबे यांच्यावर हक्कभंग दाखल करण्याच्या प्रकारावरही त्यांनी टीका केली. लोकशाही आणि राज्यघटनेवर विश्वास ठेवणारा आमचा परिवार आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून केवळ टीका-टिप्पणी करणे हा काहींचा धंदा झाला आहे, असा टोला त्यांनी लगावला. शहरातील २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसोबतच ११ प्रमुख चौकांमध्ये माहिती देणारे स्पीकर बसविण्यात आले आहेत. आगामी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर धुळमुक्त शहरासाठी धूळ नियंत्रण करणारी यंत्रे खरेदी करण्यात येणार असल्याचे तांबे यांनी सांगितले.

माहितीच्या अधिकाराच्या नावाखाली ब्लॅकमेलिंगचा धंदा काही लोकांनी सुरू केला आहे. मात्र विकासकामे थांबणार नाहीत. आगामी पाच वर्षांत संगमनेर शहरात असे काम करू की प्रत्येक नागरिकाला त्याचा अभिमान वाटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सुवर्णाताई मालपाणी यांनी थोरात-तांबे परिवाराने शहर व तालुक्याच्या विकासासाठी सातत्याने योगदान दिल्याचे सांगत नगरपरिषदेच्या उपक्रमांचे कौतुक केले.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी शासकीय जागा मर्यादित असतानाही फूड कोर्ट सुरू केल्याबद्दल नगरपरिषदेचे कौतुक केले. नागरिकांनी ओला व सुका कचरा स्वतंत्र करून स्वच्छता अभियानात सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे म्हणाल्या, लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेची टीम काम करत आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी रक्षक दल सुरू केले असून भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले आहे. शहरात ई-टॉयलेटची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'स्वच्छ संगमनेर, सुंदर संगमनेर, हरित संगमनेर' ही केवळ घोषणा नसून त्यासाठीची आमची कटिबद्धता आहे. कार्यक्रमानंतर शहरातील विविध ठिकाणी उद्घाटन सोहळे जल्लोषात पार पडले. नागरिक, महिला आणि युवकांची मोठी उपस्थिती होती. आमदार सत्यजित तांबे व नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांनी स्कूटरवरून शहरातून फेरी काढली. विविध ठिकाणी युवकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

**पोलीस प्रशासनाबाबत नाराजी - सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या कार्यक्रमाला पोलीस निरीक्षकांना निमंत्रण दिले होते का ? मग ते उपस्थित का राहिले नाहीत. शहराच्या सुरक्षेची संबंधित कार्यक्रमाला पोलीस निरीक्षकांनी उपस्थित राहणे औपचारिकता येत नाही तर त्यांची जबाबदारी आहे. निमंत्रण मिळाल्यानंतर ही जाऊ की जाऊ नये असा विचार पोलीस प्रशासनाने करणे कधीपासून सुरू झाले. निवडणूक झाल्यानंतर आम्ही अशा पद्धतीचे राजकारण कधीच केले नाही. शेवटी शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचे काम आहे. अशा विषयात राजकारण करण्याऐवजी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे असल्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.**

## दिनविशेष

२०२२: उत्तर कोरिया — देशाने नवीन कायदा मंजूर करून औपचारिकपणे स्वतःला "आण्विक राज्य" घोषित केले.

२०१६: — उत्तर कोरियाने पाचवी अण्वस्त्र चाचणी पूर्ण केली आहे.

२०१५: — एलिझाबेथ (दुसरी) युनायटेड किंग्डम वर सगळ्यात जास्त काळ राज्य करणारी राणी बनली.

२०१२: — भारतातील स्पेस एजन्सीने यशस्वीरित्या २१ पीएसएलव्ही प्रक्षेपण केले.

२००९: — ठीक ९ वाजुन ९ मिनिटे व ९ सेकंदांनी दुबई मेट्रोचे उद्‌घाटन घाटन झाले.

२००१: — व्हेनिसच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मीरा नायरच्या मॉन्सून वेडिंग चित्रपटाला गोल्डन लायन पुरस्कार मिळाला.

१९९७: — ७ वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेल्या प्रवीण ठिपसेना बुद्धिबळातील ग्रँडमास्टर किताब मिळाला.

१९९१: — ताजिकिस्ता देश सोविएत युनियनपासून स्वतंत्र झाला.१८४ तामिळींची हत्या

## जन्म

१९७४: कॅप्टन विक्रम बत्रा — भारतीय सैन्याचे कारगिल युद्धातील शहीद शूर अधिकारी, कारगिल युद्धातील पराक्रमासाठी परमवीर चक्राने सन्मानित — परमवीर चक्र (मरणोत्तर) (निधन: ७ जुलै १९९९ )

१९७४: विक्रम बात्रा — कारगिल युद्धात शहीद झालेले परमवीरचक्र प्राप्त

१९५०: श्रीधर फडके — मराठी संगीतकार आणि गायक; सुप्रसिद्ध संगीतकार सुधीर फडके यांचे पुत्र — वसुंधरा पंडित पुरस्कार, फिल्मफेअर पुरस्कार

१९४८: रशीद नाझ — पाकिस्तानी चित्रपट अभिनेते (निधन: १७ जानेवारी २०२२ )

१९४१: अबीद अली — भारतीय क्रिकेटपटू

१९४१: डेनिस रितची — अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ, सी प्रोग्रामिंग लँग्वेजचे निर्माते (निधन: १२ ऑक्टोबर २०११ )

१९१०: नवलमल फिरोदिया — गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती (निधन: २६ मार्च १९९७ )

१९०९: विला बीट्रिस प्लेयर — अमेरिकन शिक्षक, पहिल्या कृष्णवर्णीय महिला महाविद्यालयाच्या अध्यक्षा (निधन: २९ ऑगस्ट २००३ )

## मृत्यू

२०१२: नॉर्मन जोसेफ व्हाउडलँड — बार-कोडचे सहसंशोधक (जन्म: ६ सप्टेंबर १९२१ )

२०१२: व्हर्गिस कुरियन — भारतीय दुग्धोत्पादनातील धवल क्रांतीचे जनक, अमूल कंपनीचे संस्थापक — पद्म विभूषण, पद्म भूषण, पद्मश्री (जन्म: २६ नोव्हेंबर १९२१ )

२०१०: वसंत नीलकंठ गुप्ते — समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (जन्म: ९ मे १९२८ )

२००१: अहमदशाह मसूद — अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री (जन्म: २ सप्टेंबर १९५३ )

१९९९: पुरुषोत्तम दारव्हेकर — नाटककार व लेखक

१९९७: आर. एस. भट — युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाचे पहिले अध्यक्ष

१९९४: सत्यभामाबाई पंढरपूरकर — लावणी सम्राज्ञी

१९८१: बिपीन गुप्ता — भारतीय अभिनेते आणि निर्माते (जन्म: २१ ऑगस्ट १९०५ )

१९७८: जॅक एल. वॉर्नर — वॉर्नर ब्रदर्सचे सहसंस्थापक (जन्म: २ ऑगस्ट १८९२ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०९ सप्टेंबर**

## प्रवीण ठिपसे : बुद्धिबळाच्या पटावर महाराष्ट्राचा झेंडा फडकवणारा ग्रँडमास्टर

१९९७ हे वर्ष भारतीय आणि विशेषतः महाराष्ट्राच्या बुद्धिबळाच्या इतिहासातील महत्त्वाचे वर्ष ठरले. याच वर्षी भारताचे आघाडीचे बुद्धिबळपटू प्रवीण ठिपसे यांना बुद्धिबळातील प्रतिष्ठेचा ग्रँडमास्टर (GM) किताब मिळाला. सात वेळा राष्ट्रीय विजेतेपद पटकावलेल्या ठिपसे यांच्या कारकिर्दीतील हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता. त्यांच्या या यशामुळे भारतीय बुद्धिबळाला आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी एक भक्कम ओळख मिळाली.प्रवीण ठिपसे यांचा जन्म २८ ऑगस्ट १९५९ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना बुद्धिबळाची आवड होती. बुद्धिबळ हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसून त्यासाठी प्रचंड एकाग्रता, संयम, तर्कशक्ती आणि पुढील अनेक चालींचा अंदाज घेण्याची क्षमता आवश्यक असते. ठिपसे यांनी या सर्व गुणांचा सातत्याने विकास करत भारतीय बुद्धिबळात आपले वेगळे स्थान निर्माण केले.त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात उल्लेखनीय कामगिरी म्हणजे सात वेळा राष्ट्रीय बुद्धिबळ विजेतेपद मिळवणे. राष्ट्रीय स्तरावरील सातत्यपूर्ण यशामुळे ते भारतातील सर्वोत्तम बुद्धिबळपटूंमध्ये गणले जाऊ लागले. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या खेळातील अचूक डावपेच, शांतपणे परिस्थितीचे विश्लेषण करण्याची पद्धत आणि प्रतिस्पर्ध्याच्या चुका हेरण्याची क्षमता यामुळे त्यांची विशेष ओळख निर्माण झाली.१९९७ मध्ये ग्रँडमास्टर किताब मिळवणे हा त्यांच्या कारकिर्दीतील ऐतिहासिक क्षण ठरला. ग्रँडमास्टर हा किताब आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ अर्थात FIDE कडून दिला जातो. हा किताब मिळवण्यासाठी खेळाडूला आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्यंत उच्च दर्जाची कामगिरी करावी लागते. त्यामुळे ठिपसे यांना मिळालेला हा किताब त्यांच्या प्रदीर्घ मेहनतीचे आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाचे प्रतीक होता.प्रवीण ठिपसे यांचे योगदान केवळ स्वतःच्या यशापुरते मर्यादित राहिले नाही. त्यांनी पुढील पिढीतील बुद्धिबळपटूंना मार्गदर्शन करण्याचे कामही केले. बुद्धिबळाच्या प्रशिक्षणासाठी, खेळाडूंच्या मानसिक तयारीसाठी आणि भारतात या खेळाचा प्रसार करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे.महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेल्या बुद्धिबळपटूंच्या परंपरेत प्रवीण ठिपसे यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांनी मिळवलेली राष्ट्रीय विजेतेपदे आणि ग्रँडमास्टर किताब हे त्यांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकिर्दीचे द्योतक आहे.१९९७ मधील त्यांचा ग्रँडमास्टर किताब हा केवळ एका खेळाडूचा वैयक्तिक गौरव नव्हता, तर भारतीय बुद्धिबळाच्या वाढत्या सामर्थ्याचीही साक्ष होती. बुद्धिबळाच्या पटावर संयम, बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टीच्या जोरावर यश मिळवणाऱ्या प्रवीण ठिपसे यांनी अनेक युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

# कॅप्टन विक्रम बत्रांचा शौर्यगाथेने देशाला दिला अभिमान

**जन्मदिन विशेष**

कॅप्टन विक्रम बत्रा हे भारतीय लष्करातील असे शूर अधिकारी होते, ज्यांनी १९९९ च्या कारगिल युद्धात असामान्य शौर्य, नेतृत्व आणि त्यागाचे दर्शन घडवले. त्यांच्या पराक्रमाची दखल घेत भारत सरकारने त्यांना मरणोत्तर परमवीरचक्र या भारताच्या सर्वोच्च लष्करी शौर्य पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या धैर्याची आणि देशभक्तीची गाथा आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे.विक्रम बत्रा यांचा जन्म ९ सप्टेंबर १९७४ रोजी हिमाचल प्रदेशातील पालमपूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये देशसेवेची भावना होती. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी भारतीय लष्करात प्रवेश केला. १९९६ मध्ये इंडियन मिलिटरी अकादमी, डेहराडून येथून प्रशिक्षण पूर्ण करून ते भारतीय लष्करात अधिकारी म्हणून दाखल झाले.१९९९ मध्ये पाकिस्तानने कारगिल परिसरातील भारतीय हद्दीत घुसखोरी करून काही महत्त्वाच्या उंच पर्वतीय ठिकाणांवर कब्जा केला. या घुसखोरीविरुद्ध भारतीय लष्कराने ऑपरेशन विजय सुरू केले. या युद्धात कॅप्टन विक्रम बत्रा यांच्या नेतृत्वाखालील जवानांनी अत्यंत कठीण परिस्थितीत शत्रूशी मुकाबला केला.पॉइंट ५१४० हे अत्यंत महत्त्वाचे आणि सामरिक ठिकाण होते. ते ताब्यात घेण्याची जबाबदारी कॅप्टन बत्रा यांच्या तुकडीवर होती. प्रचंड उंची, खडतर भूप्रदेश आणि शत्रूचा तीव्र गोळीबार अशा आव्हानात्मक परिस्थितीत त्यांनी आपल्या जवानांचे नेतृत्व केले. त्यांच्या धाडसी नेतृत्वामुळे भारतीय सैनिकांनी हे ठिकाण यशस्वीरीत्या ताब्यात घेतले.या विजयाच्या वेळी कॅप्टन बत्रा यांनी रेडिओ संदेशातून दिलेला "ये दिल मांगे मोर!" हा उत्स्फूर्त संदेश विशेष प्रसिद्ध झाला. त्यांच्या आक्रमक नेतृत्वामुळे आणि धैर्यामुळे ते आपल्या सहकाऱ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय झाले.यानंतर पॉइंट ४८७५




ताब्यात घेण्याच्या मोहिमेतही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ही लढाई अत्यंत कठीण होती. आपल्या सहकाऱ्यांना वाचवण्यासाठी आणि शत्रूच्या ठिकाणावर निर्णायक हल्ला करण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. ७ जुलै १९९९ रोजी या कारवाईदरम्यान कॅप्टन विक्रम बत्रा शत्रूशी लढताना शहीद झाले. त्या वेळी त्यांचे वय अवघे २४ वर्षे होते.त्यांच्या सर्वोच्च बलिदानाची दखल घेत भारत सरकारने त्यांना मरणोत्तर परमवीरचक्र प्रदान केले. हा पुरस्कार त्यांच्या असामान्य शौर्याचा राष्ट्रीय सन्मान आहे.कॅप्टन विक्रम बत्रा यांचे जीवन अत्यंत कमी कालावधीचे असले, तरी त्यांनी आपल्या पराक्रमाने भारतीय लष्करी इतिहासात अजरामर स्थान मिळवले. "तिरंगा फडकवून परत येईन, नाहीतर तिरंग्यात लपेटून येईन," या भावनेने देशासाठी लढणाऱ्या या वीराची गाथा आजही तरुणाईला प्रेरणा देते.कॅप्टन विक्रम बत्रा हे नाव म्हणजे शौर्य, नेतृत्व, त्याग आणि मातृभूमीवरील निस्सीम प्रेमाचे प्रतीक आहे. कारगिलच्या रणभूमीवर त्यांनी दिलेले सर्वोच्च बलिदान भारताच्या इतिहासात सदैव स्मरणात राहील.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

कुत्रा हरवला आहे
कोको नावाचा लॅब जातीचा कुत्रा हरवला आहे
कृपया कुणाला आढळल्यास संपर्क करावा
योग्य बक्षिस दिले जाईल
संपर्क - श्रीमती रोहिणी विठ्ठल जाधव
चैतन्य नगर शिक्षक कॉलनी बंगला नं. ५, ता. संगमनेर, जि. अ.नगर
फोन - 9765918136



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# माझी बदनामी करणाऱ्यांना आता सोडणार नाही

## आ. खताळ यांचा प्रसाद गुंजाळसह विरोधकांना इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मी कायद्याचा सन्मान करतो म्हणून आतापर्यंत शांत आहे. मात्र संगमनेर तालुक्याचे राजकारण अत्यंत खालच्या पातळीवर गेले असून, विनाकारण माझी बदनामी करण्याचा प्रयत्न यापूर्वीही झाला आहे. आता मात्र मी शांत बसणार नाही. या प्रकारामागे कोण कोण आहे, याचा शोध पोलीस प्रशासनाने घ्यावा देखील आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.



आमदार खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात सोमवारी (दि. ७) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी सामाजिक माध्यमांवरून आपल्याला सातत्याने लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करत संबंधित व्यक्तीविरोधात कायदेशीर नोटीस बजावून गुन्हा दाखल करणार असल्याचे सांगितले. लोकप्रतिनिधीविरोधात भावपूर्ण श्रद्धांजलीची पोस्ट टाकली जाते, ही अत्यंत गंभीर बाब आहे. पराभव जिव्हारी लागल्यामुळेच हे उद्योग सुरू असल्याचे दिसते. संबंधित व्यक्तीशी माझे कोणतेही संबंध नाहीत. त्याच्याशी माझा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. हा प्रकार मी आमदार होण्यापूर्वीचा आहे; मात्र मी आमदार झाल्यानंतरच तो उकरून काढण्यात आला आहे.

मला कोणालाही एक रुपयाचे देणे नाही आणि कोणाकडून एक रुपया घेणेही नाही.संबंधित व्यक्ती शेअर बाजारात आर्थिक अडचणीत सापडली आहे. मात्र या संपूर्ण प्रकरणामागे राजकीयदृष्ट्या कोण कोण आहे, याचाही मी शोध घेतला आहे. या प्रकरणात पोलिस प्रशासना च्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केला.संबंधित व्यक्तीच्या हालचालीं बाबत पोलिसांना माहिती असताना त्याच्यावर योग्य वेळी कारवाई का झाली नाही? माझे खांडगाव येथे जाणे पोलिस प्रशासनाला माहिती होते. तरीही संबंधित व्यक्तीला ताब्यात का घेतले नाही? पोलिसांची गोपनीय शाखा नेमके काय करत आहे, याची चौकशी झाली पाहिजे. अशी मागणी त्यांनी केली. संबंधित व्यक्तीचे मोबाईल ताब्यात घेऊन त्याचे दूरध्वनी संपर्क तपशील तपासावेत. संबंधित व्यक्तीविरुद्ध अनेक गुन्हे दाखल आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. याबाबत मी मुख्यमंत्री यांची भेट घेऊन दाद देखील मागणार आहे.सामाजिक माध्यमांवरून सातत्याने मला लक्ष्य केले जात आहे. या प्रकारामागे कोण आहे, हे मी शोधून काढले आहे. संबंधित व्यक्तीला कायदेशीर नोटीस पाठविण्यात येईल आणि आवश्यक ती कायदेशीर कारवाई केली जाईल. माझे कार्यकर्तेही माझ्यासाठी सक्षम आहेत; मात्र मी कायद्याच्या मार्गानेच पुढे जाणार आहे. असेही आ. खताळ यांनी सांगितले. आ. खताळ पाटील यांच्या खंबीर नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यात अनेक विकासाची अनेक कामे वेगाने सुरू आहेत आणि याच राजकीय वैफल्यातून राजकीय विरोधक अशा प्रकारचे कृत्य किंवा त्याला समर्थन देत आहे. परंतू संगमनेरकर जनता सुज्ञ असून ती महायुतीच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. राजकीय वैर अशा प्रकारे वाढवून शहराच्या किंवा तालुक्याच्या विकासाला काही फायदा होणार नाही. त्यामुळे आपल्यावर वारंवर चिखलफेक करणाऱ्यांचा आपण बंदोबस्त करू असे आ. अमोल खताळ म्हणाले.

# जरांगे यांच्या उपोषणाचा ११ वा दिवस

## सरकारकडून मराठा समाजासाठी चार मोठे निर्णय

जालना (वृत्तसंस्था)

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी जालना येथील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या ११ दिवसांपासून उपोषण सुरू आहे. आज त्यांच्या उपोषणाचा ११ दिवस आहे. मध्यंतरी त्यांनी सलाईन घेतले असले, तरी त्यांची प्रकृती बिघडत चालली आहे. त्यामुळे मराठा आंदोलकांमधील अस्वस्थता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या पातळीवर महत्त्वाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्य सरकारने चार महत्त्वाचे निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने चार विविध शासकीय आदेश जारी केले आहेत. या निर्णयांमुळे मराठा, कुणबी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक तसेच रोजगाराच्या दृष्टीने दिलासा मिळणार आहे.

**१. मराठा विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गाप्रमाणे शैक्षणिक सवलती-** तंत्रशिक्षण संचालनालयाने सर्व विभागीय कार्यालये आणि विद्यापीठांना निर्देश जारी केले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधांचा लाभ तातडीने लागू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**२. वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी २०० कोटींचा निधी** - आर्थिकदृष्ट्या दुर्बल, आर्थिकदृष्ट्या मागास आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागणीद्वारे हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**३. सारथीच्या परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती धोरणात सुधारणा** - सारथी संस्थेमार्फत दिल्या जाणाऱ्या परदेशी शिक्षण शिष्यवृत्तीच्या धोरणात सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार परदेशी विद्यापीठांची शिक्षण फी थेट संबंधित संस्थेला अदा केली जाणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीच्या रकमेवरील कमाल मर्यादा काढण्यात आली आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना दरवर्षी १,५०० अमेरिकी डॉलर, तर ब्रिटनसाठी १,१०० पौंड अतिरिक्त निर्वाह व आकस्मिक भत्ता देण्यात येणार आहे. विद्यापीठांची निवड करण्यासाठी जागतिक क्रमवारीवर आधारित नवीन गुणवत्ता यादी पद्धती लागू करण्यात आली आहे.

**४. १,४४० तरुणांना मोफत वाहनचालक व वाहक प्रशिक्षण-** सारथी संस्थेने पिंपरी-चिंचवड येथील वाहनचालक प्रशिक्षण संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार १,४४० मराठा आणि कुणबी तरुणांना हलकी व जड मोटार वाहन चालविण्याचे तसेच वाहकाचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे प्रशिक्षण १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार असून, प्रशिक्षण घेणाऱ्या किमान १,००० लाभार्थ्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळवून देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पद: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# राज्यावर पावसाची वक्रदृष्टी ; शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

युवावार्ता (प्रतिनिधी)

राज्यात यंदाच्या मॉन्सूनमध्ये पावसाचे असमान चित्र पाहायला मिळत असून, जून महिन्यात पावसाने ओढ दिल्यानंतर जुलैमध्ये दमदार पावसाने हजेरी लावली. जुलै महिन्यात झालेल्या चांगल्या पावसामुळे राज्यातील अनेक धरणे भरली आणि काही भागातील पाणीटंचाईचे संकट काही काळासाठी दूर झाले. मात्र, ऑगस्ट महिन्यात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.



ऑगस्टमध्ये राज्यात चांगला पाऊस होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात अनेक भागात पावसाने दडी मारल्याचे चित्र आहे. त्यामुळे खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता असून, अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. आता शेतकरी सप्टेंबरमधील पावसाकडे डोळे लावून बसले आहेत.

यंदाच्या मॉन्सूनवर एल निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता सुरुवातीपासूनच व्यक्त करण्यात येत होती. त्यातच आता सप्टेंबर महिन्यातही राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यातील मान्सूनचे वारे सध्या कमकुवत झाले आहेत. वातावरणातील आर्द्रतेचे प्रमाण कमी असून, राज्यावर सध्या कोणतीही प्रभावी हवामान प्रणाली सक्रिय नाही. त्यामुळे पुढील चार ते पाच दिवस राज्यात पावसाची शक्यता कमी असून, बहुतांश भागात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.

जुलैमध्ये झालेल्या दमदार पावसानंतर ऑगस्टमध्ये पावसाचा जोर कमी झाल्याने अनेक भागांतील शेतकऱ्यांसमोर पिके वाचविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. काही भागांत उपलब्ध पाण्यावर शेती सुरू असली तरी पावसाने आणखी ओढ दिल्यास खरीप पिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सप्टेंबर महिन्यातील एकूण पाऊसही सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता असल्याने आगामी काळात पावसाचे चित्र कसे राहते, याकडे शेतकरी, प्रशासन आणि जलसंपदा विभागाचे लक्ष लागले आहे. पुढील काही दिवस पावसाची प्रतीक्षा कायम राहणार असल्याने राज्यातील अनेक भागांतील शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait. Neither DO WE
24 तास सुविधांसाठी 02425 - 224761 मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिमनाय्
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25